दूरध्वनी : ४४७६९३८, ४४७५५७१, ४४७८३२५
फॅक्स : ०२० - ४४७७०९०
इ-मेल : dir_mscert@vsnl.net

ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३०.

क्रमांकः मराशैसंप्रप/प्रशियो/२००४-०५/३४-ट/022
दिनांक :- ३१ डिसेंबर २००४

प्रति

प्राचार्य
खानदेश शिक्षणशास्त्र महाविद्यालय
जळगाव

**विषय :- केंद्रपुरस्कृत शिक्षक शिक्षण योजना ०४-०५**
**शिक्षक शिक्षण महाविद्यालय (सी.टी.ई.)**

**महोदय/महोदया,**

आपणास कळविण्यात अत्यानंद होत आहे की, आपल्या संस्थेचा दर्जा केंद्रशासनाने शिक्षक शिक्षण महाविद्यालय म्हणून वाढविण्याचे मान्य केलेअसून प्रगत अभ्यास शिक्षण संस्थामधून मान्यता प्रदान करण्याचे मान्य केले आहे. त्याबद्दल आपले,आपल्या सहकाऱ्यांचे आणि विद्यापीठ अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! लवकरच याबाबत राज्य शासनाचे आदेश आपणास प्राप्त होतील. आपल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा आणि नावलौकीक विचारात घेऊन आपल्या संस्थेस शिक्षक प्रशिक्षण व माध्यमिक/ उच्चमाध्यमिक स्तरावर अधिक कार्य करण्याची संधी दिलेली आहे. प्रामुख्याने माध्यमिक/उच्चमाध्यमिक व शिक्षक प्रशिक्षकांचे सेवान्तर्गत प्रशिक्षण, संशोधन, शालेय स्तरावरील गुणवत्ता वाढीचा प्रयत्न इत्यादीबाबत आपणास बहुमोल कार्य करता येईल. आपली संस्था देशपातळीवरील एक अग्रगण्य प्रगत अभ्यास शिक्षण संस्था म्हणून पुढे येईल व अत्युत्कृष्ट शैक्षणिक कार्याचा आदर्श सर्वासमोर ठेवेल असा विश्वास आहे. आपला नावलौकीक असाच वाढत जावो हीच सदिच्छा !

एन.आर.सी./एन.सी.टी.ई. प्रकाशनातील एक उतारा नोव्हेंबर २००३ मधील परिषदेच्या बैठकीच्या वेळी आपणास देण्यात आला होता. तथापि सुलभ संदर्भास्तव त्याची प्रत सोबत माहितीस्तव जोडली आहे.

नववर्षांच्या शुभेच्छासह !

आपला विश्वासू,

(एम.जी.मराठे)
संचालक

VUB/571M
CTE → Records file
7/1/20-1.